## शनिवारी २४४ जोडप्यांचे होणार शिवसेनेच्या सामूहिक विवाह सोहळ्यात शुभमंगल

### महाराष्ट्राचे राज्यपाल व शिवसेना पक्षप्रमुख यांची प्रमुख उपस्थिती

४२ बौद्ध व ८ मुस्लिम तर १९५ हिंदू जोडपे, ११ भन्ते आणि ८ मौलवी, ५१ पुरोहितांच्या अधिपत्याखाली होणार विवाहबद्ध

**वऱ्हाड्यांच्या स्वागतासाठी संभाजीनगर सज्ज,**

**संभाजीनगर, दि. १४** – दुष्काळाच्या भयंकर वणव्यात होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या संकल्पनेतून शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे कन्यादान योजनेअंतर्गत संभाजीनगर येथे १६ एप्रिल, शनिवार रोजी भव्य सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून दुपारी १२.४५ मुहूर्तावर तब्बल २४४ जोडप्यांचे शुभमंगल महाराष्ट्राचे राज्यपाल सी एच विद्यासागर राव व शिवसेना पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे यांनी प्रमुख उपस्थितीत होणार आहे. रेल्वे स्टेशन रोड वरील अयोध्यानगरीच्या मैदानावर होणाऱ्या या भव्यदिव्य शुभमंगल विवाह सोहळ्याचे साक्षीदार होऊन नवीन जीवनाची सुरुवात करणाऱ्या वधु वरांना आशीर्वाद देण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन या सोहळ्याचे संयोजक शिवसेना उपनेते चंद्रकांत खैरे यांनी केले आहे.

परभणी नंतर सामूहिक विवाह सोहळ्याचे दुसरे पर्व आता संभाजीनगरात होत आहे. त्यासाठी १६ एप्रिल, शनिवारी, दुपारी १२.४५ चा मुहूर्त धरण्यात आला आहे. केंद्रीय अवजड उद्योग मंत्री अनंत गीते, परिवहनमंत्री दिवाकर रावते, खासदार राजकुमार धूत, संपर्कप्रमुख विनोद घोसाळकर, महापौर त्रिंबक तुपे यांच्या सह शिवसेनेचे नेते, मंत्री, उपनेते, खासदार, आमदार, जिल्हाप्रमुख मराठवाड्यातील सर्व अंगीकृत संघटनांचे आजी माजी पदाधिकारी, लोकप्रतिनिधी यांची उपस्थिती असणार आहे. या सोहळ्याचे मार्गदर्शक पालकमंत्री रामदास कदम हे असून संयोजक उपनेते खासदार चंद्रकांत खैरे आहेत.

सोहळ्यासाठी भव्यदिव्य मंडप उभारण्यात आला असून आकर्षक व्यासपीठ उभारण्यात आले आहे. स्वतंत्र भोजनकक्ष उभारण्यात आला आहे. येणाऱ्या वऱ्हाड्यांच्या सरबराईत कोणतीही कसर राहू नये यासाठी शिवसैनिकांच्या वेगवेगळ्या समित्या करण्यात आल्या असून स्वतंत्रपणे जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे पाण्याची कमतरता भासू नये यासाठी स्वतंत्र नियोजन करण्यात आले आहे. सफारीपासून पैठणीपर्यंत सामूहिक विवाह सोहळ्यात

जी जोडपी आपल्या वैवाहिक जीवनाचा श्रीगणेशा करणार आहेत त्यांच्यासाठी हा संस्मरणीय क्षण आहे. त्यामुळे शिवसेनेने वर-वधूंची खास काळजी घेतली आहे. नवरदेवासाठी कडक सफारी, बूट तर नवरीला पदरावर जरतारी मोर असलेली पैठणी, चप्पल देण्यात येणार आहे. एवढेच नाही तर भांडीकुंडी, दिवाण, गादी, कपाट, पंखा, चहागाळणीपासून कुकरपर्यंत असा सारा संसार शिवसेना या जोडप्यांना मांडून देणार आहे.

सामूहिक विवाह सोहळ्यासाठी २४४ जोडप्यांनी नोंदणी केली आहे. दुर्गम, दुष्काळी तालुका म्हणून परिचित असलेल्या सोयगाव तालुक्यातून सर्वाधिक ६६ जोडप्यांची नोंदणी झाली असून, कन्नड ४३, सिल्लोड २८, संभाजीनगर शहर २६, वैजापूर १९, गंगापूर १६, संभाजीनगर पूर्व १७, गंगापूर १६, संभाजीनगर पश्चिम १५, रत्नपूर ९, पैठण ४ आणि फुलंब्रीमधून एका जोडप्याची नोंद झाली आहे. विशेष म्हणजे या २४४ जोडप्यांमध्ये ४२ बौद्ध व ८ मुस्लिम जोडप्यांचा समावेश आहे. उर्वरित सर्व जोडपी हिंदू आहेत. हा विवाह सोहळा ५१ पुरोहित, ११ भन्ते आणि ८ मौलवींच्या अधिपत्याखाली होणार आहे. वऱ्हाड्यांच्या स्वागतासाठी संभाजीनगर सज्ज झाले असून सरबराईत कोणतीही कसर राहू नये यासाठी शिवसैनिक रात्रीचा दिवस करत आहेत. शिवसेनेच्या नियोजनाची व शिस्तीची चुणूक या नियोजनातून दिसत आहे.

पालकमंत्री रामदास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली संयोजक शिवेसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांच्या नेतृत्वात सहसंपर्कप्रमुख अण्णासाहेब माने, जिल्हाप्रमुख अंबादास दानवे, नरेंद्र त्रिवेदी, महानगरप्रमुख प्रदीप जैस्वाल, आमदार संजय शिरसाट, उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, बंडू ओक, गटनेते राजू वैद्य, शहरप्रमुख बाळासाहेब थोरात, संतोष जेजुरकर, जिल्हायुवाधिकारी ऋषीकेश खैरे, नगरसेवक सिद्धांत शिरसाट, किशोर कच्छवाह आदी पदाधिकारी, विवाहस्थळ परिसरात तळ ठोकून सोपविलेल्या जबाबदारी शिवसेना पदाधिकाऱ्यांच्या व शिवसैनिकांच्या मदतीने पार पाडत आहेत. तर आमदार संदीपान भुमरे, आमदार हर्षवर्धन जाधव, उपजिल्हाप्रमुख भाऊ सांगळे, रघुनाथ चव्हाण, राजू राठोड, गणेश चोपडे, तालुका प्रमुख अण्णा शिंदे, राजेंद्र राठोड, अशोक शिंदे, रमेश बोरनारे, प्रकाश दुबे, अंकुश सुंब, किशोर कुकलारे, दिलीप मचे, किशोर अग्रवाल, सुनील मिरकर हे वधू वरांच्या वरातीची तय्यारी करत आहेत.